**(कार्यालयीन प्रत)**

# मंजूरी पत्र

कर्ज खाते क्रमांक:
अर्ज क्रमांक:
बीसी शाखा:

महोदया, तारिख: ...........................

आरबीएल बँकेची निवड केल्याबद्दल धन्यवाद. तुमच्या कर्जाचे तपशील या पत्राची पुरवणी I म्हणून जोडलेल्या फॅक्टशीटमध्ये उपलब्ध आहेत.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| **कर्जदाराचे नाव** | | **पती/ वडिलांचे नाव** | | **कस्टमर आयडी** | |
| **गटाचे नाव** | | **सेन्टरचे नाव** | | **बेसिक सेविंग बँक डिपॉजिट अकाउंट नंबर** | |

**मी गटाची सदस्य असल्याने गटातील इतर सर्व सदस्यांची हमी स्वीकारते ज्यांची नावे खाली दिलेली आहेत:**

| **अनुक्रमांक** | **सदस्याचे नाव** | **कर्ज खाते क्रमांक** | **कर्जाची रक्कम** |
|---|---|---|---|
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |

कर्जाची सुविधा देण्याची विनंती करणाऱ्या तुमच्या अर्ज आणि पुढील स्पष्टीकरण आणि संपर्काच्या संदर्भात, फॅक्टशीटमध्ये नमूद केल्याप्रमाणे कर्जाची रक्कम मंजूर झाल्याचे कळवताना आम्हाला आनंद होत आहे. तुम्हाला देय असलेले हप्ते लोन कार्डमध्ये दिलेले आहेत जे कर्जाच्या कागदपत्रांची पूर्तता करते वेळी तुम्हाला स्वतंत्रपणे देण्यात आलेले. ही सुविधा कर्जाच्या अर्जामध्ये नमूद अटी आणि नियम आणि फॅक्टशीटमध्ये स्पष्ट निर्देशित केलेल्या शुल्क भरण्याच्या अधीन आहे.

कृपया लक्षात घ्या आमच्याकडील तुमच्या सर्व खात्यांसाठी तुमचा कस्टमर आयडी एकमेव आहे. तुम्ही निवडलेल्या खात्याच्या प्रकाराच्या आधारे तुमचे खाते तुम्हाला विशेष सेवांची श्रेणी प्रदान करते.

आमची उत्पादने आणि सेवांविषयी माहिती, अटी आणि नियम आणि शुल्कांचे वेळापत्रक आमच्या वेबसाइट https://rblbank.com/ वर प्रादेशिक भाषेमध्ये उपलब्ध आहे.

तुमच्या आरबीएल बचत खात्यासाठी संचालनाची पद्धत एकच आहे.

कृपया फक्त आरबीएल बँक लिमिटेडच्या अधिकृत व्यक्ती किंवा बँकेच्या अधिकाऱ्यांद्वारे नियुक्त केलेल्या व्यवसाय प्रतिनिधीकडेच पैसे द्या.

आपले विश्वासू,

आरबीएल बँक लिमिटेड साठी

**Vijay Anandh**
**Head-Retail Assets**
**अधिकृत हस्ताक्षरकर्ता**

कर्जदाराची सही/ अंगठ्याचा ठसा

कर्जदाराचे नाव:.............................................

**(ग्राहक प्रत)**

# मंजूरी पत्र

RBL BANK apno ka bank

कर्ज खाते क्रमांक:
अर्ज क्रमांक:
बीसी शाखा:

महोदया, तारिख: ...........................

आरबीएल बँकेची निवड केल्याबद्दल धन्यवाद. तुमच्या कर्जाचे तपशील या पत्राची पुरवणी I म्हणून जोडलेल्या फॅक्टशीटमध्ये उपलब्ध आहेत.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| **कर्जदाराचे नाव** | | **पती/ वडिलांचे नाव** | | **कस्टमर आयडी** | |
| **गटाचे नाव** | | **सेन्टरचे नाव** | | **बेसिक सेविंग बँक डिपॉजिट अकाउंट नंबर** | |

**मी गटाची सदस्य असल्याने गटातील इतर सर्व सदस्यांची हमी स्वीकारते ज्यांची नावे खाली दिलेली आहेत:**

| **अनुक्रमांक** | **सदस्याचे नाव** | **कर्ज खाते क्रमांक** | **कर्जाची रक्कम** |
|---|---|---|---|
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |

कर्जाची सुविधा देण्याची विनंती करणाऱ्या तुमच्या अर्ज आणि पुढील स्पष्टीकरण आणि संपर्काच्या संदर्भात, फॅक्टशीटमध्ये नमूद केल्याप्रमाणे कर्जाची रक्कम मंजूर झाल्याचे कळवताना आम्हाला आनंद होत आहे. तुम्हाला देय असलेले हप्ते लोन कार्डमध्ये दिलेले आहेत जे कर्जाच्या कागदपत्रांची पूर्तता करते वेळी तुम्हाला स्वतंत्रपणे देण्यात आलेले. ही सुविधा कर्जाच्या अर्जामध्ये नमूद अटी आणि नियम आणि फॅक्टशीटमध्ये स्पष्ट निर्देशित केलेल्या शुल्क भरण्याच्या अधीन आहे.

कृपया लक्षात घ्या आमच्याकडील तुमच्या सर्व खात्यांसाठी तुमचा कस्टमर आयडी एकमेव आहे. तुम्ही निवडलेल्या खात्याच्या प्रकाराच्या आधारे तुमचे खाते तुम्हाला विशेष सेवांची श्रेणी प्रदान करते.

आमची उत्पादने आणि सेवांविषयी माहिती, अटी आणि नियम आणि शुल्कांचे वेळापत्रक आमच्या वेबसाइट https://rblbank.com/ वर प्रादेशिक भाषेमध्ये उपलब्ध आहे.

तुमच्या आरबीएल बचत खात्यासाठी संचालनाची पद्धत एकच आहे.

कृपया फक्त आरबीएल बँक लिमिटेडच्या अधिकृत व्यक्ती किंवा बँकेच्या अधिकाऱ्यांद्वारे नियुक्त केलेल्या व्यवसाय प्रतिनिधीकडेच पैसे द्या.

आपले विश्वासू,

आरबीएल बँक लिमिटेड साठी

**Vijay Anandh**
**Head-Retail Assets**
**अधिकृत हस्ताक्षरकर्ता**

कर्जदाराची सही/ अंगठ्याचा ठसा

कर्जदाराचे नाव:...............................................

(कार्यालयीन प्रत)

## फॅक्टशीट

| अनुक्रमांक | मानक | तपशील |
|---|---|---|
| 1 | कर्जाची रक्कम (₹ मध्ये) | |
| 2 | व्याज दर (स्थिर) (टक्क्यांमध्ये) | |
| 3 | कर्जाची मुदत (महिन्यांमध्ये) | |
| 4 | परतफेडीची वारंवारता | |
| 5 | समान मासिक हप्ता (ईएमआय) ची संख्या | |
| 6 | *ईएमआय रक्कम | |
| 7 | ईएमआय भरण्याची तारिख | |
| 8 | कर्जफेडीचे वेळापत्रक / मुद्दल आणि व्याजाचे विभाजन | परतफेड वेळापत्रकामध्ये समाविष्ट केले जाईल जे कर्ज वाटपानंतर देण्यात येईल आणि तसेच बँकेद्वारे वेळोवेळी कर्जदाराला कळवले जाऊ शकते. |
| 9 | ईएमआय सुरु होण्याची तारिख | |
| 10 | **लोनच्या संपूर्ण मुदतीच्या दरम्यान आकारलेले एकूण व्याज (₹. मध्ये) | |
| 11 | ***इतर आगाऊ शुल्क (प्रत्येक घटकाची विभागणी खाली दिलेली आहे (₹. मध्ये) | |
| 11.i | लोन प्रोसेसिंग फी | |
| 11.ii | विम्याचा प्रिमियम | |
| 11. iii | हॉस्पिटल कॅश प्रिमियम | |
| 12 | वितरित केली जाणारी निव्वळ रक्कम (कर्जाची रक्कम - इतर आगाऊ शुल्क) {कोणतेही मुदत-पूर्व समाप्तीचे शुल्क वगळून} (₹. मध्ये) | |
| 13 | देय असलेली कर्जाची एकूण रक्कम (मुद्दल रक्कम + व्याजाची रक्कम + आगाऊ शुल्क) (₹. मध्ये) | |
| 14 | प्रभावी वार्षिक व्याज दर (टक्क्यांमध्ये) | |
| **आकस्मिक शुल्कांचे तपशील** | | |
| 15 | कर्जाची मुदतपूर्व परतफेड केल्यास दंडात्मक शुल्क | शून्य |
| 16 | विलंब देय झाल्यास दंडात्मक शुल्क | शून्य |
| 17 | इतर शुल्क | शून्य |

*पहिल्या ईएमआयची रक्कम ही वितरणाची तारिख आणि पहिल्या ईएमआयच्या तारखेच्या आधारे बदलेल. पूर्व-ईएमआय व्याज हे पहिल्या ईएमआय सोबत देणे आहे.

*कर्ज मुदतीच्या दरम्यान ग्राहकाकडून मिळालेल्या आगाऊ रक्कम/ विलंबित भरणाच्या आधारे शेवटच्या ईएमआयची रक्कम बदलेल.

** पहिल्या ईएमआयची तारिख आणि वितरणाची तारिख यांमधील फरकानुसार एकूण व्याज दर बदलेल.

**जीएसटी आणि इतर कर जसे लागू असतील तसे आकारण्यात येतील.

**(ग्राहक प्रत)**

## फॅक्टशीट

| अनुक्रमांक | मानक | तपशील |
| --- | --- | --- |
| 1 | कर्जाची रक्कम (₹ मध्ये) | |
| 2 | व्याज दर (स्थिर) (टक्क्यांमध्ये) | |
| 3 | कर्जाची मुदत (महिन्यांमध्ये) | |
| 4 | परतफेडीची वारंवारता | |
| 5 | समान मासिक हप्ता (ईएमआय) ची संख्या | |
| 6 | *ईएमआय रक्कम | |
| 7 | ईएमआय भरण्याची तारिख | |
| 8 | कर्जफेडीचे वेळापत्रक / मुद्दल आणि व्याजाचे विभाजन | परतफेड वेळापत्रकामध्ये समाविष्ट केले जाईल जे कर्ज वाटपानंतर देण्यात येईल आणि तसेच बँकेद्वारे वेळोवेळी कर्जदाराला कळवले जाऊ शकते. |
| 9 | ईएमआय सुरु होण्याची तारिख | |
| 10 | **लोनच्या संपूर्ण मुदतीच्या दरम्यान आकारलेले एकूण व्याज (₹. मध्ये) | |
| 11 | ***इतर आगाऊ शुल्क (प्रत्येक घटकाची विभागणी खाली दिलेली आहे (₹. मध्ये) | |
| 11.i | लोन प्रोसेसिंग फी | |
| 11.ii | विम्याचा प्रिमियम | |
| 11. iii | हॉस्पिटल कॅश प्रिमियम | |
| 12 | वितरित केली जाणारी निव्वळ रक्कम (कर्जाची रक्कम - इतर आगाऊ शुल्क) {कोणतेही मुदत-पूर्व समाप्तीचे शुल्क वगळून} (₹. मध्ये) | |
| 13 | देय असलेली कर्जाची एकूण रक्कम (मुद्दल रक्कम + व्याजाची रक्कम + आगाऊ शुल्क) (₹. मध्ये) | |
| 14 | प्रभावी वार्षिक व्याज दर (टक्क्यांमध्ये) | |
| **आकस्मिक शुल्कांचे तपशील** | | |
| 15 | कर्जाची मुदतपूर्व परतफेड केल्यास दंडात्मक शुल्क | शून्य |
| 16 | विलंब देय झाल्यास दंडात्मक शुल्क | शून्य |
| 17 | इतर शुल्क | शून्य |

* पहिल्या ईएमआयची रक्कम ही वितरणाची तारिख आणि पहिल्या ईएमआयच्या तारखेच्या आधारे बदलेल. पूर्व-ईएमआय व्याज हे पहिल्या ईएमआय सोबत देणे आहे.

* कर्ज मुदतीच्या दरम्यान ग्राहकाकडून मिळालेल्या आगाऊ रक्कम/ विलंबित भरणाच्या आधारे शेवटच्या ईएमआयची रक्कम बदलेल.

** पहिल्या ईएमआयची तारिख आणि वितरणाची तारिख यांमधील फरकानुसार एकूण व्याज दर बदलेल.

**जीएसटी आणि इतर कर जसे लागू असतील तसे आकारण्यात येतील.

## जॉइंट लाइबिलिटी ग्रूप/ संयुक्त दायित्व गट ("जेएलजी") च्या अटी आणि नियम

**अट विशेष कर्ज:**

1. मी/आम्ही आरबीएल बँक लिमिटेड ("**बँक**") कडून, जॉइंट लाइबिलिटी ग्रूप (जेएलजी) लोन प्रोग्राम अंतर्गत, क्रेडिट सुविधा ("**कर्ज**") घेतली आहे. यापुढे मी कर्जासोबत व्याज आणि इतर शुल्क/ मूल्य/ खर्चाची परतफेड करण्यासाठी संयुक्तपणे आणि वैयक्तिकपणे जबाबदार असेन जसे कर्जाच्या अर्ज आणि इतर संबंधित कागदपत्रांमध्ये (एकत्रितपणे "**कर्जाची कागदपत्रे**" म्हटले जाते) स्पष्ट केलेले आहे. कमी होत जाणाऱ्या शिल्लकवरील व्याजदरानुसार कर्ज सुरु राहते.
2. या अटी आणि नियम कर्जाच्या वितरणाच्या तारखेपासून सुरु होतील, आणि गटातील/ सेन्टरतील सर्व कर्जदारांद्वारे संपूर्ण कर्जाची परतफेड करेपर्यंत, किंवा बँकेद्वारे आधी समाप्त केले जाईपर्यंत लागू राहतील.
3. कर्ज त्याच उद्देश्यासाठी वापरले गेले पाहिजे जसे अर्जामध्ये नमूद केलेले आणि ज्यासाठी ते मंजूर झाले आहे. कर्जाच्या अर्जामध्ये उल्लेखित उद्देश्याच्या व्यतिरिक्त किंवा कोणत्याही सट्टेबाजीच्या उद्देश्यासाठी कर्जदार हे कर्ज वापरणार नाही.
4. कर्जदार कर्जावरील व्याज देय करण्यासाठी बँकेसोबत करार करतो आणि कर्जदाराची सर्व देणी कर्जदाराने परतफेड करेपर्यंत शेड्यूल I मध्ये नमूद केल्याप्रमाणे दरवर्षी अशा दराने कर्जदाराने बँकेला देय असू शकते. सुविधेवरील व्याज सुविधेच्या वितरणाच्या पहिल्या तारखेपासून जमा होण्यास सुरुवात होईल.
5. पहिला हप्ता वितरणाच्या तारखेनुसार आणि/ किंवा अतिरिक्त व्याज किंवा इतर कोणतेही समायोजन असल्यास बदलू शकतो.
6. निर्धारित केलेले व्याज दर पुनरावृत्तीच्या अधीन असतील आणि बँकेच्या मार्जिनल कॉस्ट ऑफ फंड बेस्ड लेंडिंग रेट (MCLR) मधील बदलावर किंवा भारतीय रिझर्व्ह बँकेच्या वेळोवेळी निर्देशांवर अवलंबून, रीसेट केले जातील.
7. सर्व व्याज आणि इतर सर्व शुल्क, ज्यामध्ये खर्चावरील कोणतेही व्याज, शुल्क, खर्च, फोरक्लोजर शुल्क (असल्यास) दिवसेंदिवस जमा होतील आणि 365 (तीनशे पासष्ट) दिवसांचे वर्ष आणि गेलेल्या दिवसांच्या वास्तविक संख्येच्या आधारे मोजले जाईल.
8. कर्जाचे वेळेवर भरणा करणे आणि कर्जाच्या अटी व शर्तींचे पालन करणे ही कर्जदाराची जबाबदारी आहे. वेळेवर देय करणे हे कर्जाचे मूळ तत्व आहे.
9. कोणतेही शुल्क, किंवा अतिरिक्त व्याजाशिवाय कर्जदाराद्वारे कर्जाचे मुदतपूर्व देय केले जाऊ शकते.
10. मी/आम्ही सहमत आहोत की बँक सध्याची कर्जे, परतफेडीचा इतिहास यासह कर्जाशी संबंधित सर्व माहिती बँकेच्या कोणत्याही समूह कंपनी, इतर बँका, क्रेडिट ब्युरो, सेवा पुरवठादार, वैधानिक आणि नियामक प्राधिकरणांसह सामायिक करू शकते. मी सहमत आहे की सिबिल किंवा अशी अधिकृत कोणतीही एजन्सी त्यांना योग्य वाटेल त्या पद्धतीने बँकेने उघड केलेली माहिती आणि डेटा वापरू/प्रक्रिया करू शकते. सिबिल किंवा अशी अधिकृत कोणतीही एजन्सी त्यांच्या द्वारे तयार केलेली प्रक्रिया केलेली माहिती, डेटा आणि प्रोडक्ट्स बँका, आर्थिक संस्था ("एफआय") किंवा इतर क्रेडिट ग्रँटर्स किंवा नोंदणीकृत वापरकर्त्यांना विचारात घेण्यासाठी सादर करू शकते जसे या संदर्भात आरबीआयद्वारे निर्दिष्ट केलेले असू शकते.
11. बँक कर्जदाराच्या पतपात्रतेची योग्यता समजू शकेल अशा प्रकारच्या स्वरूपाची चौकशी करण्यासाठी किंवा करण्यास कारणीभूत ठरण्यासाठी बँकेला अधिकार असेल. पुढे कर्जदाराची पत योग्यता सिद्ध करण्यासाठी आवश्यक असणारी अशी प्रमाणपत्रे कर्जदारांकडून मागवण्याचा बँकेला अधिकार असेल.
12. बँक, तिच्या स्वतःच्या आणि संपूर्ण निर्णयानुसार, तुम्हाला दिलेल्या किंवा देण्यात येणाऱ्या कर्जाच्या मर्यादेचे नूतनीकरण/ वाढ करू शकते. इथे दिलेल्या कोणत्या अटी आणि नियमांचे पालन न झाल्यास/ उल्लंघन झाल्यास आणि तसेच वेळोवेळी बँकेला सादर करण्यात आलेल्या संबंधित कागदपत्रांमध्ये किंवा कोणत्याही माहिती/ तपशीलामध्ये चूक आढळल्यास किंवा बँकेच्या मते अशी कोणतीही घटना किंवा परिस्थिती उद्‌भवल्यास, ज्यामध्ये अशा विस्तार किंवा वितरणामुळे त्यांच्या हितांवर हानिकारक परिणाम होईल/ होण्याची शक्यता आहे, कोणतीही सूचना न देता सुविधा खंडित करण्याचा आणि कोणतेही वितरण रोखण्याचा/ थांबवण्याचा अधिकार बँकेकडे आहे. बँकेचा निर्णय अंतिम आणि कर्जदारासाठी बंधनकारक असेल.
13. बँक आणि/किंवा तिच्या प्रतिनिधींसोबत परस्पर संमतीने नियुक्त केलेल्या बैठकी/शिबिरांना कर्जदार उपस्थित राहतील. कर्जदार दोन किंवा अधिक सलग प्रसंगी बैठकींमध्ये उपस्थित राहण्यात अयशस्वी झाल्यास, बँक आणि/किंवा तिचे प्रतिनिधी कर्जदाराने बँकेला देय असलेली आणि देय असलेली सर्व थकबाकी जमा करण्यासाठी कर्जदाराच्या निवासस्थानी/ कामाच्या भेट देऊ शकतात.
14. कर्जदार पुढे सहमत आहे की बँकेला कधीही आणि वेळोवेळी येथे नमूद केल्याप्रमाणे व्याज दर, अतिरिक्त व्याज आणि/किंवा व्याज आकारण्याचा कालावधी इत्यादी बदलण्याचा अधिकार असेल जे ते कधीही बँकेची वेबसाइट (www.rblbank.com) वर किंवा स्थानिक वर्तमानपत्रात प्रकाशित करून करु शकते किंवा अशा बदलांविषयी बँकेला योग्य वाटेल त्या सुचनेच्या इतर कोणत्याही माध्यमाद्वारे कर्जदाराला कळवेल आणि त्यानंतर बदललेल्या दराने व्याज आकारण्याचा अधिकार असेल/ बाकी असेच राहिल जसे कर्ज दस्तऐवजांचा भाग होते.
15. बँकेने ठरविल्यानुसार विमा पॉलिसी समर्पण करण्याच्या बाबतीत, मी/आम्ही बँकेला नवीन कर्ज खात्यात माझ्याद्वारे देय रकमेसाठी सरेंडर लागू करण्याचा अधिकार देतो/देते.

16. कर्ज देय करण्यास कसूर केल्यास, आरबीएल बँकेला कोणत्याही एक कर्जदाराने पैसे देय न केल्यास गटातील/ सेन्टरतील इतर सदस्यांकडून वसूल करण्याचा अधिकार आहे.
17. खालीलपैकी कोणतेही प्रसंग उद्भवल्यास ती 'डिफॉल्टची घटना' बनते:
    a. जर कर्जदार या जेएलजी सुविधेअंतर्गत मुद्दल किंवा व्याज किंवा अन्यथा देय असलेली कोणतीही रक्कम करारामध्ये नमूद वेळेत आणि येथे निर्दिष्ट केलेल्या पद्धतीने किंवा याच्या अनुषंगाने अंमलात आणलेल्या कोणत्याही दस्तऐवजाच्या अटींनुसार भरण्यात अयशस्वी झाल्यास;
    b. या JLG सुविधेअंतर्गत किंवा कर्जदार आणि बँक यांच्यातील इतर कोणत्याही करार, अटी किंवा करारांच्या कामगिरीमध्ये कर्जदार कसूर करत असल्यास;
    c. कर्जदाराने बँकेकडे कर्जासाठी दिलेल्या अर्जामध्ये किंवा कोणतेही सादरीकरण दिशाभूल करणारे किंवा चुकीचे असल्याचे आढळल्यास किंवा कोणतीही भौतिक वस्तुस्थिती/माहिती दडवली किंवा लपवली गेली.
    d. जर कर्जदार आर्थिक अडचणींमुळे किंवा कोणतीही कसूर करण्याच्या विचाराने किंवा फायद्यासाठी किंवा त्याच्या कर्जदारांच्या संयोजनाने किंवा मान्य करतो, साधारणपणे त्याची देणी थकीत असल्याने ते फेडण्यास असमर्थ आहे किंवा कोणतीही थकबाकी भरण्याचा आदेश दिला जातो आणि अशी थकबाकी थकीत झाल्यानंतर भरली जात नाही (परंतु, शंका टाळण्यासाठी या उप-खंडातील कोणत्याही कर्जबाजारीपणा मध्ये अशा कोणत्याही कर्जबाजारीपणाचा समावेश नसेल जी विवादित आहे आणि ज्या संदर्भात कर्जदाराच्या विरुद्ध अशाप्रकारच्या कर्जाची परतफेड करण्यासाठी न्यायालयीन आदेश आलेला नाही);

    e. कर्जदाराद्वारे दिलेल्या कोणत्याही हमी किंवा भरपाईची पूर्तता केली जात नाही आणि कर्जदाराला बोलावले जाते;
    f. कर्जदार बँकेला आवश्यक असलेली माहिती/कागदपत्रे सादर करण्यात अयशस्वी होतो.
    g. जर कर्जदार इथे दिलेल्या तारखेपासून ती करत असलेला व्यवसाय बंद करते किंवा करण्याची धमकी देते;
    h. जर कर्जदार कोणतीही कारवाई करते किंवा (i) कर्जदारावर खटला चालवण्यासाठी किंवा नादार किंवा दिवाळखोर ठरवले जाण्यासाठी, किंवा (ii) लिक्विडेटर, प्रशासक, विश्वस्त किंवा प्राप्तकर्ता किंवा कर्जदाराच्या तत्सम अधिकाऱ्याची किंवा त्याच्या उपक्रमाचा संपूर्ण किंवा कोणताही भाग, मालमत्ता आणि मालमत्ता यांची नियुक्ती; साठी कोणतीही कायदेशीर कारवाई सुरु केली जाते किंवा इतर पाउले उचले जातात.
    i. जर कर्जदाराने हे कर्ज नाकारले किंवा हे कर्ज नाकारण्याचा हेतू सिद्ध करणारी कोणतीही कृती किंवा गोष्ट केली किंवा करायला लावली;
    j. जर अशी कोणतीही घटना घडते जी बँकेच्या मते बँकेत्या हितासाठी हानिकारक आहे किंवा एकमेव बँकेच्या मते कर्जदाराच्या आर्थिक स्थिती किंवा या कर्जाच्या अंतर्गत सर्वच किंवा कोणतीही जबाबदारी पूर्ण करण्याच्या किंवा या जेएलजीच्या कोणत्याटी अटींचे पालन करण्याच्या त्यांच्या क्षमतेस भौतिकरित्या प्रभावित करण्याची शक्यता आहे.
    k. जर कर्जदार कर्जाचा गैरवापर करते किंवा काही भाग ज्या उद्देश्यासाठी कर्ज मंजूर करण्यात आले आहे त्याव्यतिरिक्त इतर कोणत्याही उद्देश्यासाठी वापरते.
    l. या जेएलजी कर्जाच्या पूर्तता, वितरण, वैध्यता, अंमलबजावणी किंवा स्वीकार्यतेच्या पुराव्याच्या संदर्भात कर्जदाराला कोणतीही संमति, अधिकृतता, स्वीकृती किंवा परवाना किंवा नोंदणी किंवा सरकारी किंवा सार्वजनिक नोंदणीसाठी घोषणापत्र किंवा सरकारी किंवा सार्वजनिक संस्था किंवा प्राधिकरणाच्या घोषणापत्राची आवश्यकता लागते किंवा कर्जदाराद्वारे इथे अंतर्भूत त्याच्या जबाबदारींच्या पूर्ततेमध्ये बँकेसाठी अस्वीकार्य पद्धतीने बदल केला जातो किंवा मंजूर केले जात नाही किंवा रद्द केले जाते किंवा समाप्त केले जाते किंवा कालबाह्य होते.
18. जर वर नमूद केलेल्या घटनांपैकी एक किंवा अधिक घटना घडल्या असतील, तर बँक कर्जदाराला लेखी सूचनेद्वारे कर्जाचे मुद्दल आणि सर्व जमा झालेले व्याज घोषित करू शकते जे कर्जदाराला या JLG कर्जाच्या अंतर्गत किंवा अटींनुसार आणि/ किंवा बँक आणि कर्जदारामध्ये अस्तित्वात असलेल्या इतर कोणत्याही करार, कागदपत्रे तसेच इतर सर्व शुल्क आणि देय देणे आहे आणि अशी घोषणा केल्यानंतर ते देय होतील आणि तात्काळ सुलभपणे, काहीही थकीत न ठेवता भरायची असेल.
19. कर्जाच्या दस्तऐवजांची अंमलबजावणी आणि मुद्रांकन किंवा कर्जाच्या अनुषंगाने सुरक्षा निर्मिती यासह, कर्जाच्या संदर्भात इतर कोणतेही शुल्क किंवा बँकेला झालेले खर्च किंवा दावे कर्जदाराकडून वसूल करण्याचा सुद्धा बँकेला अधिकार आहे.
20. कर्जदाराने, बँकेच्या इतर कोणत्याही अधिकाराचा पूर्वग्रह न ठेवता, बँकेला नुकसान भरपाई द्यावी आणि बँकेला कोणतेही नुकसान, खर्च, शुल्क किंवा खर्चाची भरपाई आणि परतफेड करावी ज्याला देय करण्यात कसूर झाल्याच्या परिणामस्वरुप किंवा अन्यथा कर्जाच्या संदर्भात ती टिकून राहिल्याचे किंवा तिच्याद्वारे खर्च केल्याचे बँक प्रमाणित करेल.
21. कर्जदार बँकेला त्याच्या व्यवसायावर किंवा नफ्यावर लक्षणीय परिणाम होण्याची शक्यता असलेल्या कोणत्याही घटनेची माहिती देईल. उदाहरणार्थ, जर मासिक उत्पन्न बँकेला सूचित केले गेले होते त्यापेक्षा खूपच कमी असेल तर, कर्जदार त्यानुसार बँकेला स्पष्टीकरण आणि प्रस्तावित उपाययोजनांसह सूचित करेल.
22. कर्जदाराने सर्व सरकारी मागण्या जसे आय कर आणि भारत सरकार किंवा कोणतेही राज्य सरकार किंवा स्थानिक प्राधिकरणाला देय असलेले इतर सर्व कर आणि महसूल भरलेले आहेत आणि सध्या अशा कोणत्याही कर आणि महसूलांची देय आणि थकीत रक्कम बाकी नाही.
23. कर्जदार सहमत आहे आणि समजून घेते की कर्जदार क्रेडिट लाइफ इन्शुरन्ससाठी विमा प्रीमियम भरेल, ज्याद्वारे कर्जदार आणि तिच्या जोडीदाराला विमा पॉलिसीच्या कालावधीपर्यंत विमा संरक्षण मिळेल. मृत्यूसारख्या अनपेक्षित परिस्थितीत, विमा पॉलिसीच्या दाव्याच्या सेटलमेंटची रक्कम थेट कर्ज खात्यात जमा केली जाईल. कर्ज समायोजनानंतरची कोणतीही शिल्लक रक्कम माझ्या/आमच्या नामनिर्देशित व्यक्तींना दिली जाईल.
24. मी/आम्ही याद्वारे खाते उघडण्यासाठी ई-केवायसी प्रमाणीकरण करण्याचे स्वीकारतो/ स्वीकारते आणि ते मंजूरी पत्र स्वीकारल्याच्या कबुलीच्या स्वरुपात तयार केले जाईल आणि त्यानुसार मंजूरी पत्रामध्ये ई-प्रमाणीकरणाची तारिख आणि वेळ छापण्यात येईल.
25. वर उल्लेखित सर्व अटी आणि नियम मला समजणाऱ्या भाषेमध्ये मला समजावण्यात आले आहेत.
26. तुम्हाला भरायचा असलेला हप्ता लोन कार्डमध्ये नमूद करण्यात आला आहे. ही सुविधा कर्जाच्या अर्जामध्ये नमूद अटी आणि नियम आणि तुमच्याद्वारे शुल्क भरणेच्या अधीन आहे.

27. कर्जदार कर्जाशी संबंधित किंवा संदर्भातील अशा सर्व महसूल, शुल्क आणि कर (व्याज, मुद्रांक शुल्क आणि कोणतेही इतर कर, असल्यास) सहन करतील जे कोणत्याही सरकारद्वारे किंवा इतर प्राधिकरणाद्वारे वेळोवेळी कायद्याच्या मंजुरीने वेळोवेळी आकारले जातील. सर्व आनुषंगिक खर्च जसे की मुद्रांक शुल्क, विमा हप्ते, संकलन/वसुली शुल्क, वकिलांची फी आणि कर्जाच्या संबंधात काही उद्भवल्यास इतर शुल्क कर्जदाराद्वारे उचलले जातील.

28. कर्जाच्या कालावधी दरम्यान कधीही, कर्जदाराला कोणतीही पूर्वसूचना न देता, बँक, स्वतःच्या विवेकबुद्धीनुसार, कर्ज रद्द करू शकते आणि कोणतेही वितरण रोखू/थांबवू शकते. बँक कर्जदाराला लेखी नोटीस देऊन आणि कर्जाच्या अटींनुसार उपलब्ध असलेल्या अधिकार आणि उपायांबद्दल पूर्वग्रह न ठेवता, कर्जदाराला सुविधेसंदर्भात कर्जदाराची सर्व देय रक्कम भरण्यासाठी बोलवू शकते आणि/किंवा भरपाईचा अधिकाराचा वापर करण्यास सांगू शकते. अटी आणि शर्तींच्या सर्व तरतुदी पूर्ण अंमलात आणि प्रभावात राहतील ज्याप्रमाणे येथे विशेषतः यथायोग्य फेरफार करून लागू करणे प्रदान केले आहेत, जोपर्यंत कर्जदाराद्वारे सर्व देयांची परतफेड केली जात नाही.

29. भारतीय कायद्यांनुसार आणि त्या शहराच्या न्यायालयांनुसार कर्जावर नियंत्रण ठेवले जाईल जेथे बँक कर्ज खाते सांभाळत आहे आणि/किंवा जेथे कर्ज वितरित केले आहे तेथे विशेष अधिकार क्षेत्र असेल.

वरील बाबींना न जुमानता, इतर कोणत्याही शहरातील कोणत्याही न्यायालय, मंच किंवा न्यायाधिकरणात कार्यवाही सुरू करण्याचा/फाइल करण्याचा अधिकार बँकेने राखून ठेवला आहे, जेथे या प्रकरणाचा न्यायाधिकार असू शकतो आणि कर्जदार याद्वारे बँकेच्या या अधिकाराला संमती देतो.

30. याखालील कोणतीही सूचना, मागणी, विधान किंवा संप्रेषण बँकेच्या अधिकाऱ्यांच्या स्वाक्षरीने केले जाईल (लिखित किंवा इलेक्ट्रॉनिक कोणत्याही स्वरुपात) आणि प्रत्यक्ष किंवा इलेक्ट्रॉनिक पद्धतीने वितरित केले जाईल आणि कर्जदाराच्या शेवटच्या ज्ञात पत्त्यावर वितरणाच्या किंवा वितरित करण्याचा प्रयत्न करण्याच्या तारखेपासून प्रभावी असेल.

31. मी/ आम्ही आरबीएल बँकेमद्ये बचत खाते उघडले आहे. मी/आम्ही बँक पासबूक जारी करण्याची निवड रद्द करतो आणि पासबुक अपडेट्सच्या बदल्यात बीसी शाखांमध्ये अपडेट केलेले खाते विवरण प्राप्त करण्यास संमति देतो. असे खाते विवरण जारी करण्यासाठी बँक शुल्क आकारणार नाही.

32. एचडीएफसी लाईफच्या बाबतीत, संलग्न सीओआय हे ग्रूप जीवन सुरक्षा च्या विमा कवरसाठी आहे ज्याची जोखिम सुरु होण्याची तारिख आणि प्रभावी होण्याची तारिख कर्ज वितरणाची तारिख आहे.

33. **<u>आयआरएसीपी नियमांविषयी नेहमी विचारले जाणारे प्रश्न</u>**

a. 'देय' शब्दाचा अर्थ काय आहे?

'देय' शब्द म्हणजे मुद्दल/ व्याज/ लोन खात्यावर आकारलेले कोणतेही शुल्क जे कर्ज सुविधा मंजूरीच्या नियमांनुसार नमूद कालावधी मध्ये भरायचे आहेत.

b. 'थकीत देय' शब्दाचा अर्थ काय आहे?

'थकीत देय' शब्द म्हणजे मुद्दल/ व्याज/ लोन खात्यावर आकारलेले कोणतेही शुल्क जे भरायचे आहेत, परंतु भरलेले नाही किंवा कर्ज सुविधा मंजूरीच्या नियमांनुसार नमूद कालावधीच्या आधी भरलेले नाही.

c. कर्ज संस्थेकडील कर्जाच्या संदर्भात 'थकीत देय' म्हणजे काय?

कोणत्याही कर्ज सुविधेच्या अंतर्गत कर्ज संस्थेला देय असलेली कोणतीही रक्कम ही 'थकीत देय' आहे जर तुम्ही कर्ज संस्थेद्वारे निश्चित केलेल्या नियत तारखेला किंवा त्याआधी भरलेली नाही.

d. स्ट्रेस्ड अकाउंट म्हणजे काय?

कर्जदारांनी कर्जाचा लाभ घेण्यापूर्वी मान्य केलेल्या अटींनुसार नियतकालिक अंतराने ईएमआय/ हप्ता/ व्याज भरणे आवश्यक आहे. जर असे ईएमआय/ हप्ता/ व्याजाची देय रक्कम मान्य केलेल्या अटींनुसार देय तारखेला किंवा त्यापूर्वी भरले गेले नाही, तर अशा खात्याला 'स्ट्रेस्ड अकाउंट' असे म्हणतात.

e. स्पेशल मेंशन्ड अकाउंट (एसएमए) काय आहे?

थकीत रक्कम देय करण्यास कसूर झाल्यामुळे तणावाची लक्षणे दाखवणारे कर्ज खाते 'स्पेशल मेन्शन अकाउंट्स (एसएमए)' म्हणून वर्गीकृत केले जाईल. अशी खाती 90 दिवसांच्या आत नियमित न केल्यास 'नॉन परफॉर्मिंग ॲसेट्स (एनपीए)' म्हणून वर्गीकृत केली जातात.

f. एसएमए चे वर्गीकरण कसे केले जाते?

एसएमएचे खालील उप-श्रेणींमध्ये वर्गीकरण केले जाते:

| एसएमए / एनपीए श्रेणी | वर्गीकरणाचा आधार - मुद्दल किंवा व्याज देय किंवा इतर कोणतीही रक्कम पूर्णपणे किंवा अंशतः थकीत झाली आहे. |
|---|---|
| SMA-0 | 30 दिवसांपर्यंत |
| SMA-1 | 30 दिवसांपेक्षा अधिक आणि 60 दिवसांपर्यंत |

| | |
|---|---|
| | |
| SMA-2 | 60 दिवसांपेक्षा अधिक आणि 90 दिवसांपर्यंत |
| NPA | 90 दिवसांपेक्षा अधिक |

g. नॉन परफॉर्मिंग ॲसेट्स काय आहे?

अशी क्रेडिट सुविधा जेथे खाली दर्शवल्याप्रमाणे तणाव/ कसूर/ अभाव दिसून येतात, अशा कर्ज खात्यांना नॉन परफॉर्मिंग ॲसेट्स (एनपीए) म्हणून वर्गीकृत केले जाते.

i) मुदत कर्जाच्या संदर्भात व्याज आणि/किंवा मुद्दलाचा हप्ता 90 दिवसांपेक्षा जास्त कालावधीसाठी थकीत राहतो.

h. एसएमए-0, एसएमए-1, एसएमए-2 आणि एनपीओ म्हणून कर्जाच्या वर्गीकरणाचे उदाहरण:

i) अशा खात्यांच्या संदर्भात जेथे ईएमआय/ हप्ते देय आहेत:

उदाहरण*: जर एक कर्ज खात्याच्या देय भरणाची अंतिम तारीख 31 मार्च, 2022 आहे आणि कर्ज देणाऱ्या संस्थेद्वारे या तारखेसाठी दिवसअखेर प्रक्रिया चालवण्याच्या आधी संपूर्ण देय रक्कम प्राप्त न झाल्यास, थकीत रक्कमेची तारीख 31 मार्च 2022 असेल आणि 31.03.2022 रोजी खात्याचे एसएमए-0 म्हणून वर्गीकरण केले जाईल. जर ही थकीत रक्कम कायम राहते, तर 30 एप्रिल 2022 च्या दिवशी म्हणजेच थकीत रक्कम कायम राहण्याचे 30 दिवस पूर्ण केल्यानंतर, दिवसअखेर प्रक्रिया चालवल्यानंतर या खात्यास एसएमए-1 म्हणून टॅग केले जाईल. त्यानुसार, त्या खात्यासाठी एसएमए-1 वर्गीकरणाची तारीख 30 एप्रिल 2022 असेल. त्याच प्रमाणे, जर खाते थकीत राहणे सुरु राहते, तर 30 मे 2020 च्या दिवस-अखेर प्रक्रिया केल्यावर एसएमए-2 म्हणून टॅग केले जाईल, आणि जर हे पुढे थकीत राहणे सुरु राहते, तर 29 जून 2022 च्या दिवस-अखेर प्रक्रिया केल्यानंतर हे एनपीए म्हणून वर्गीकृत होईल.*

i. कर्ज देणाऱ्या संस्था कोणत्या कालावधीत खात्यांचे एसएमए किंवा एनपीए असे वर्गीकरण करतात?

कर्ज देणाऱ्या संस्था दिवस-अखेरच्या प्रक्रियेदरम्यान दररोजच्या आधारावर खात्यांचे एसएमए/ एनपीए म्हणून वर्गीकरण करण्याची प्रक्रिया करतात.

j. कर्जदाराची सर्वच कर्ज खाती एनपीए म्हणून वर्गीकृत केली जातील की फक्त त्याचे एक कर्ज खाते एनपीए होईल?

होय, एनपीए वर्गीकरण हे कर्जदारानुसार होते, खात्यानुसार नाही. त्यामुळे कर्जदाराचे एक कर्ज खाते एनपीए म्हणून वर्गीकृत केले असल्यास, कर्जदाराचे इतर सर्व कर्ज खाते देखील एनपीए म्हणून वर्गीकृत केले जातील.

k. एनपीए मार्किंग प्रक्रियेदरम्यान दिवसभरात भरलेली/ जमा केलेली रक्कम विचारात घेतली जाते का?

दिवसअखेरच्या प्रक्रियांच्या आधी प्राप्त झालेली कर्जाची रक्कम हे ॲसेट वर्गीकरण प्रक्रिया करतेवेळी कसूर गणनेसाठी विचारात घेतले जाते. नंतर मिळालेली कोणताही कर्जाची रक्कम नंतरच्या दिवसासाठी प्राप्त म्हणून विचारात घेतली जाते.

l. एनपीए म्हणून वर्गीकृत केल्यानंतर कर्जदाराची खाती कशाप्रकारे नियमित स्थितीत अद्ययावत केली जातात?

कर्जदाराचे थकबाकी असलेले सर्व कर्ज खाते नियमित झाल्यावर आणि कर्जदाराच्या खात्याची तपासणी/ नवीनीकरण आणि स्टॉक आणि बूक डेट संदर्भातील संलग्न अनियमिततांमध्ये सुधारणा केल्यानंतरच एनपीए म्हणून वर्गीकृत केलेली कर्ज खाती स्टँडर्ड ॲसेट मध्ये अद्ययावत केली जातील.

m. खाते स्ट्रेस/एनपीएमध्ये सरकल्यास कर्जदारावर काय परिणाम होतो?

नियामक मार्गदर्शक तत्त्वांनुसार बँकेला वेळोवेळी सेंट्रल रिपॉझिटरी इंफॉर्मेशन ऑफ लार्ज क्रेडिट (CRILC), क्रेडिट इंफॉर्मेशन कंपन्या इत्यादींना स्ट्रेस/ डिफॉल्ट/ एनपीएचा अहवाल द्यावा लागतो ज्याचा कर्जदाराच्या क्रेडिट हिस्ट्री आणि संलग्न परिणामांवर प्रभाव पडतो.

(सूचना: हे लक्षात घेण्यासारखे आहे की उपरोक्त म्हटल्याप्रमाणे ग्राहक शिक्षणाची सामग्री उदाहरणात्मक स्वरूपाची आहे आणि म्हणून, आरबीआय द्वारे प्रदान केलेले आयआरएसीपी निकष आणि वर्गीकरण वेळोवेळी अंमलबजावणीसाठी प्रचलित राहतील)

**<u>आरबीएल बँकेची घोषणा:</u>**

34. आरबीएल बँक थकबाकी वसूल करण्यासाठी वसूली एजन्सीच्या सेवा वापरू शकते. कर्मचारी वर्गातील सर्व सदस्य किंवा बँकेचे प्रतिनिधित्व करण्यासाठी अधिकृत असलेल्या कोणत्याही व्यक्तीला कर्जदारांसोबत आपल्या व्यवहारांवर नियंत्रण ठेवणाऱ्या योग्य पद्धती आणि मार्गदर्शक तत्वांचे पालन करणे आवश्यक आहे. बँक तिच्या कर्मचाऱ्यांच्या आणि/ किंवा रिकव्हरी एजन्सी/ सेवा पुरवठादारांच्या कर्मचाऱ्यांच्या अयोग्य वर्तनासाठी नेहमीच जबाबदार असेल आणि कर्जदाराने उपस्थित केलेल्या तक्रारींचे वेळेवर निराकरण करेल.

**<u>ई-केवायसीसाठी विशिष्ट अटी:</u>**

35. आधार सीडिंग/ जोडणी संमति: मी/आम्ही, इथे, आरबीएल बँकेला माझ्या खात्याशी आधार जोडण्यासाठी/ सीडिंगसाठी अधिकृत करतो. मी/आम्ही माझा आधार क्रमांक जमा करतो/ करते आणि यासाठी स्वेच्छेने माझी संमती देतो/ देते:
    - युआयडीएआय कडून मला प्रमाणित करण्यासाठी माझे/ आमचे आधार तपशील वापरणे.
    - मला एसएमएस अलर्ट्स पाठवण्यासाठी अर्जामध्ये नमूद केल्यानुसार माझा/ आमचे मोबाइल क्रमांचा वापरणे.
    - तुमच्या बँकेतील माझ्या विद्यमान/ नवीन/ भविष्यातील खाते आणि कस्टमर प्रोफाइल्स (सीआयएफ) सोबत आधार क्रमांक जोडणे.

**मी याद्वारे आरबीएल बँकेला अधिकृत करते**

**माझ्या कर्ज वितरण दस्तऐवजांच्या मान्यतेच्या उद्देशाने युआयडीएआय च्या आधार आधारित ईकेवायसी सेवांद्वारे माझ्या ओळखीचे प्रमाणीकरण करण्यासाठी माझे आधार/ व्हर्च्युअल आयडी तपशील वापरणे.**

**वरील अटी आणि नियमांशी मी सहमत आहे आणि स्वीकारते.**

कर्जदाराची सही/ अंगठ्याचा ठसा

कर्जदाराचे नाव:............................................